**महा पोलीस न्यूज । दि.२२ जुलै २०२५ ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील संगणकशास्त्र प्रशालेच्या सायबर सिक्युरिटी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींनी, विशाखा शिंदे आणि श्रद्धा अहिरराव यांनी जळगाव शहरात सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण जनजागृती मोहीम राबवली. या विद्यार्थिनींनी जिल्हा पेठ पोलीस स्टेशन आणि भास्कर मार्केट परिसरात सायबर गुन्हे आणि त्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

या मोहिमेदरम्यान, विशाखा शिंदे आणि श्रद्धा अहिरराव यांनी सायबर गुन्हेगारीची विविध उदाहरणे देऊन उपस्थित पोलीस कर्मचारी, अधिकारी आणि सर्वसामान्य जनतेला सायबर धोक्यांची जाणीव करून दिली. त्यांनी फिशिंग, ऑनलाईन फसवणूक, डेटा चोरी यांसारख्या सामान्य सायबर गुन्ह्यांपासून स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली. यामध्ये मजबूत पासवर्ड वापरणे, अनोळखी लिंक्सवर क्लिक न करणे, सॉफ्टवेअर अपडेटेड ठेवणे आणि आपली वैयक्तिक माहिती काळजीपूर्वक हाताळणे यासारख्या बाबींवर भर देण्यात आला.